दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


**आजचे पंचांग**

दिनांक : २४ ऑगस्ट २०२६ वार : सोमवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : द्वदशी तिथी (२५ ऑगस्ट सकाळी ०६:२० पर्यंत) त्यानंतर त्रयोदशी तिथी नक्षत्र : पूर्वाषाढा नक्षत्र (रात्री ०८:२७ पर्यंत) त्यानंतर उत्तराषाढा नक्षत्र योग : प्रीति योग (सकाळी ०७:०३ पर्यंत) त्यानंतर आयुष्मान योग करण : भाव करण (सायंकाळी ०५:२२ पर्यंत)

**समुद्रात मालवाहू जहाज बुडाले; २२ जण बेपत्ता**

**नवी दिल्ली :** भारताच्या पूर्व किनाऱ्याजवळ पनामा देशाचा ध्वज असलेले मालवाहू जहाज बुडाल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. 'ओशन विनर' नावाच्या या जहाजावर एकूण २४ कर्मचारी होते. त्यापैकी दोन चिनी नागरिकांना वाचवण्यात यश आले असून, उर्वरित २२ जण अद्याप बेपत्ता आहेत. रविवारी, २३ ऑगस्ट रोजी भारतीय तटरक्षक दल आणि नौदलाने बेपत्ता कर्मचाऱ्यांचा शोध घेण्यासाठी मोठी शोध व बचाव मोहीम सुरू ठेवली. जहाजाने अचानक एका बाजूला झुकण्यास सुरुवात केली आणि त्यानंतर अवघ्या आठ मिनिटांत ते समुद्रात बुडाले.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३२६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### सत्ताधाऱ्यांच्या आमदारांना मुख्यमंत्र्यांचा 'बॅकअप'? मग कायदा-सुव्यवस्था कोणाच्या भरवशावर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सांगली : प्रतिनिधी**

भडकाऊ आणि प्रक्षोभक वक्तव्यांवरून राज्याचे राजकारण पुन्हा तापले आहे. भाजप आमदार महेश लांडगे यांच्या कथित वक्तव्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट निशाणा साधला आहे. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना सरकारचेच संरक्षण असेल, तर कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी कोणाची? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

सुळे यांनी प्रक्षोभक वक्तव्य करणाऱ्या 'वाचाळवीर' आमदारांना वेळीच आवरावे, अन्यथा गुन्हे दाखल करून अटक करावी, अशी मागणी केली आहे. अशा वक्तव्यांमुळे सामाजिक वातावरण बिघडून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो आणि त्याची किंमत निष्पाप नागरिकांना मोजावी लागू शकते, असा इशाराही त्यांनी दिला.

या प्रकरणाचा राजकीय पैलू अधिक गंभीर आहे. कायदा सर्वांसाठी समान आहे, असे सरकार सांगते; मग सत्ताधारी पक्षातील लोकांसाठी त्याच कायद्याची अंमलबजावणी वेगळी आहे का? एखादा सामान्य नागरिक आक्षेपार्ह किंवा चिथावणीखोर वक्तव्य करतो तेव्हा पोलिस तत्परतेने कारवाई करतात; मग लोकप्रतिनिधी असल्यामुळे त्यांना वेगळे निकष लागू होणार आहेत का? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे गृहमंत्री असल्याने या आरोपांना अधिक गांभीर्य प्राप्त झाले आहे. कोणत्याही पक्षाचा नेता असो, सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी भाषेची मर्यादा पाळणे आवश्यक आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, सरकारने राजकीय सोय पाहण्याऐवजी कायद्याचे राज्य सिद्ध करणे गरजेचे आहे. सुळे यांनी महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेची आठवण करून देत छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा दाखला दिला. या महाराष्ट्रात दडपशाहीची किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीची भाषा खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

# वकिलांची सर्वोच्च संस्था की सत्तेचा आखाडा? बीसीआयमध्ये १५० कोटींच्या आरोपांनी खळबळ!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : : प्रतिनिधी**

देशातील वकिली व्यवसाय आणि कायदेशीर शिक्षणाचे नियमन करणाऱ्या बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) मध्येच आता सत्तासंघर्षाचा भडका उडाला आहे. संस्थेचे सह-अध्यक्ष आणि ज्येष्ठ वकील वाय. आर. सदाशिव रेड्डी यांनी अध्यक्ष मनन कुमार मिश्रा यांच्या राजीनाम्याची मागणी केल्याने इउखच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सर्वात धक्कादायक आरोप आहे तो सुमारे १५० कोटी रुपयांच्या निधीच्या कथित हस्तांतरणाचा. रेड्डी यांच्या म्हणण्यानुसार, BCIच्या नियंत्रणातील निधी अध्यक्षांच्या नियंत्रणाखालील PEARL-First ट्रस्टकडे वळवण्यात आला. या व्यवहाराची स्वतंत्र चौकशी आणि संबंधित खात्यांचे ऑडिट करण्याची मागणी त्यांनी केली आहे. मात्र, हे आरोप सध्या आरोपांच्या स्वरूपात असून त्यांची स्वतंत्र चौकशी होणे बाकी आहे.

**वादाची सुरुवात नेमकी कुठून झाली?**

या संघर्षाला तातडीची पार्श्वभूमी मिळाली ती छाअडअठ विद्यापीठातील कायद्याच्या विद्यार्थ्यांच्या प्रकरणातून. BCI अध्यक्षांच्या कार्यालयाकडून पदवीधर विद्यार्थ्यांच्या वकिली नोंदणीवर परिणाम करणारी कारवाई करण्यात आल्याने मोठा वाद निर्माण झाला. त्यानंतर ही कारवाई मागे घेण्यात आली आणि अध्यक्षांकडून खेद व्यक्त करण्यात आला. या प्रकरणामुळे BCIच्या अधिकारांच्या मर्यादा आणि नैसर्गिक न्यायाच्या प्रश्नांवर वकील संघटनांनी तीव्र आक्षेप घेतले.

यानंतर आर्थिक व्यवहार, नियुक्त्या आणि BCIच्या प्रशासनातील पारदर्शकतेबाबतचे प्रश्नही पुढे आले. रेड्डी यांनी मिश्रा यांच्या राजीनाम्याची मागणी करत आपल्या पत्रात आठ प्रमुख कारणे मांडली असून स्वतंत्र चौकशीसह पाच मागण्या केल्या आहेत.

**१५० कोटींचा प्रश्न एवढा गंभीर का?**

BCI ही साधी खासगी संस्था नाही. देशातील वकिली व्यवसायाचे नियमन, व्यावसायिक मानके आणि कायदे शिक्षणाशी संबंधित महत्त्वाची जबाबदारी तिच्यावर आहे. त्यामुळे तिच्या निधीचा वापर, आर्थिक निर्णय आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे अधिकार यामध्ये पारदर्शकता असणे अपेक्षित आहे.

म्हणूनच जर सार्वजनिक संस्थेच्या निधीबाबत इतका मोठा आरोप होत असेल, तर त्याचे उत्तर पत्रकातून नव्हे, तर स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशीतून मिळाले पाहिजे.

**मिश्रांचे काय म्हणणे आहे?**

मनन कुमार मिश्रा यांनी राजीनामा देण्यास नकार दिला आहे. त्यांनी आरोप फेटाळून लावत हे राजकीय वैरातून केले जात असल्याचे म्हटले आहे. ते स्वतः निवडून आलेले प्रतिनिधी असून देशातील मोठ्या वकील समुदायाचे प्रतिनिधित्व करत असल्याचा त्यांचा दावा आहे. ट्रस्टच्या खात्यांचे दरवर्षी ऑडिट होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

म्हणजेच एका बाजूला १५० कोटींच्या कथित निधी हस्तांतरणाचा आरोप, तर दुसऱ्या बाजूला आरोपच निराधार असल्याचा अध्यक्षांचा दावाआता खरी कसोटी स्वतंत्र तपासाची आहे.

**BCIमध्येच 'कायदा' कुठे हरवला?**

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात अस्वस्थ करणारा प्रश्न हा आहे की, ज्या संस्थेने देशातील वकिलांना कायद्याचे पालन, नैसर्गिक न्याय आणि पारदर्शकतेचे धडे द्यायचे, त्याच संस्थेच्या कारभारावर असे प्रश्न का निर्माण होत आहेत?

वकिलांची संस्था जर स्वतःच्या कारभाराबाबत पारदर्शक नसेल, तर ती सामान्य नागरिकाला न्याय आणि कायद्याच्या राज्याबद्दल काय संदेश देणार? हा केवळ मनन मिश्रा विरुद्ध सदाशिव रेड्डी असा वैयक्तिक संघर्ष मानून विषय संपवता येणार नाही. हा प्रश्न इउखच्या संस्थात्मक स्वायत्ततेचा, आर्थिक पारदर्शकतेचा आणि पदाधिकाऱ्यांच्या उत्तरदायित्वाचा आहे. म्हणून आता गरज आहे ती राजकीय बचावाची नव्हे, तर स्वतंत्र चौकशीची.

१५० कोटींचा आरोप खरा की खोटा, हे तपासातून स्पष्ट झालेच पाहिजे; कारण कायद्याच्या सर्वोच्च संस्थेवरच जर संशयाची सावली असेल, तर न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कोण जपणार?

> हा मुद्दा सध्या बीसीआयच्या नेतृत्वातील अंतर्गत संघर्ष, आर्थिक पारदर्शकता आणि सत्ताकेंद्रीकरण यामुळे गंभीर बनला आहे. उपलब्ध ताज्या वृत्तांनुसार, सह-अध्यक्ष वाय. आर. सदाशिव रेड्डी यांनी मनन कुमार मिश्रा यांच्या राजीनाम्याची मागणी करत १५ दिवसांची मुदत, स्वतंत्र चौकशी आणि इउखच्या निधीचे ऑडिट यांसारख्या मागण्या केल्या आहेत. त्यांनी सुमारे १५० कोटींच्या निधीच्या कथित हस्तांतरणासह नियुक्त्या, NALSAR प्रकरण आणि प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले आहेत.
>
> मिश्रा यांनी हे आरोप फेटाळले असून त्यांना राजकीय वैरातून केलेले आरोप म्हटले आहे; ट्रस्टच्या खात्यांचे नियमित ऑडिट होत असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

## जंतरमंतरनंतरच झेन जी आठवली? तरुणांच्या प्रश्नांवर सरकारचे उशिराचे 'मंथन'!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर : प्रतिनिधी**

जंतरमंतरवर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने देशाच्या राजकीय व्यवस्थेला तरुणाईच्या अस्वस्थतेची जाणीव करून दिल्यानंतर आता अचानक झेन जी युवकांचा सहभाग, स्क्रीन टाईम, स्टार्टअप आणि युवा धोरण हे शब्द सत्तेच्या भाषणात ठळकपणे दिसू लागले आहेत. नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर 'मंथन फॉर युवा'च्या माध्यमातून २५ हजारांहून अधिक युवकांना एकत्र आणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युवकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. प्रश्न मात्र एवढाचहे मंथन आजच का?

तरुणाई कालपासून बदललेली नाही. तिचे प्रश्नही कालच निर्माण झालेले नाहीत. शिक्षण, रोजगार, स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, महागडी शिक्षणव्यवस्था, कौशल्याला संधी, मानसिक ताण, डिजिटल व्यसन, स्टार्टअपसाठी भांडवल आणि राजकीय निर्णयप्रक्रियेत सहभागहे प्रश्न अनेक वर्षांपासून तरुणांच्या आयुष्याचा भाग आहेत. मग या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्यासाठी जंतरमंतरवर तरुण रस्त्यावर उतरण्याची वेळ का आली?

जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने एक महत्त्वाचा संदेश दिलाआजची झेन जी केवळ सोशल मीडियावर व्यक्त होणारी पिढी नाही. ती प्रश्न विचारते, उत्तरांची मागणी करते आणि व्यवस्थेला जाब विचारण्याची हिंमतही दाखवते. त्यामुळेच आंदोलनानंतर सत्ताधाऱ्यांपासून राजकीय पक्षांपर्यंत प्रत्येकाला 'युवा' आणि झेन जीचा अचानक शोध लागल्याचे चित्र दिसते.

नागपूरच्या कार्यक्रमात ढोल-ताशा पथकाने जागतिक विक्रम नोंदविला, ५८५ ध्वजधारकांचा सहभाग झाला, विविध क्षेत्रातील युवा आयकॉनशी संवाद झाला आणि नशामुक्तीची शपथ देण्यात आली. हे उपक्रम निश्चितच स्वागतार्ह आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा जागतिक विक्रम हा अभिमानाचा विषय आहे. मात्र विक्रम आणि कार्यक्रमांच्या पलीकडे तरुणांच्या मूळ प्रश्नांची उत्तरे कोण देणार?

मुख्यमंत्र्यांनी स्टार्टअपसाठी अधिक चांगली पॉलिसी तयार करण्याचे आश्वासन दिले. स्क्रीन टाईम कमी करून मुलांना मैदानावर आणण्यासाठी धोरण तयार करण्याचीही भूमिका मांडली. संविधानामुळे सामान्य व्यक्तीलाही नगरसेवकापासून मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचता येते, असेही त्यांनी सांगितले. पण संविधानाने दिलेल्या संधींचा प्रत्यक्ष लाभ आजच्या तरुणाला मिळतो आहे का, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

## सरकारी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा! केवळ फौजदारी खटला प्रलंबित असल्याने बडतर्फी नाही; सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

केवळ फौजदारी खटला प्रलंबित आहे या कारणावरून सरकारी कर्मचाऱ्याला सेवेतून बडतर्फ करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. कर्मचाऱ्याविरुद्ध आरोप सिद्ध होण्यापूर्वीच त्याच्या रोजगारावर गदा आणणे अन्यायकारक असल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाला अधोरेखित केले आहे.

न्यायमूर्ती दिपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने एसपीओ/कॉन्स्टेबल आयआरबी सतपाल सिंग विरुद्ध पंजाब राज्य प्रकरणात हा निर्णय दिला. कर्मचाऱ्याला स्वतःची बाजू मांडण्याची संधी न देता केवळ प्रलंबित गुन्हेगारी प्रकरणाच्या आधारावर सेवेतून काढणे योग्य नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणात संबंधित कॉन्स्टेबलला तब्बल दहा वर्षांहून अधिक काळ केवळ फौजदारी खटला प्रलंबित असल्यामुळे सेवेतून बाहेर ठेवण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाची ही भूमिका चुकीची ठरवत कलम १४२ अंतर्गत अधिकारांचा वापर करून पंजाब सरकारला संबंधित कर्मचाऱ्याला पाच लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

मात्र, न्यायालयाने एक महत्त्वाची कायदेशीर बाबही स्पष्ट केली आहे. एखादा कर्मचारी गुन्ह्यात दोषी ठरल्यानंतर त्याला प्रोबेशनवर सोडण्यात आले, तरी दोषसिद्धी आपोआप नाहीशी होत नाही. अशा परिस्थितीत विभागीय कारवाईचा मार्ग खुला राहू शकतो.

या निर्णयामुळे फौजदारी खटला सुरू आहे म्हणूनच सरकारी कर्मचाऱ्याच्या सेवेला तात्काळ धोका निर्माण होऊ नये, या तत्त्वाला मोठे बळ मिळाले आहे. प्रशासनाने कोणतीही कठोर कारवाई करण्यापूर्वी कायदेशीर प्रक्रिया, दोषसिद्धी आणि कर्मचाऱ्याला आपली बाजू मांडण्याची संधी यांचा विचार करणे आवश्यक असल्याचे या निकालातून अधोरेखित झाले आहे.

## रुग्णसेवेच्या नावाखाली सीएसआर निधीवर सरकारची नजर? धर्मादाय संस्थांपासून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षापर्यंत नियंत्रणाची नवी साखळी

### सीएसआर निधी खर्चावर राज्य सरकारचा प्रभाव वाढणार? पारदर्शकतेच्या नावाखाली कंपन्यांच्या सामाजिक निधीच्या वापरावर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

रुग्णांच्या नातेवाईकांना निवारा, भोजन, वैद्यकीय मार्गदर्शन आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यात सामंजस्य करार करण्याचा राज्य सरकारचा निर्णय प्रथमदर्शनी स्वागतार्ह वाटत असला, तरी या माध्यमातून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) निधीच्या वापरावर राज्य सरकारचा प्रभाव वाढणार का? हा महत्त्वाचा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील मोठ्या रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना सुविधा मिळाव्यात, यासाठी धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यात सामंजस्य करार करण्याचे निर्देश दिले आहेत. या यंत्रणेत धर्मादाय रुग्णालये, स्वयंसेवी संस्था आणि सरकारी यंत्रणा यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

मात्र, सीएसआर निधी हा कंपन्यांच्या कायदेशीर सामाजिक जबाबदारीचा निधी असून त्याचा वापर कोणत्या प्रकल्पासाठी करायचा, याबाबत कंपन्यांना आणि त्यांच्या संबंधित सीएसआर यंत्रणांना स्वतंत्र भूमिका असते. त्यामुळे सरकारी यंत्रणेशी समन्वय वाढवताना हा निधी अप्रत्यक्षपणे सरकारी प्राधान्यक्रमांकडे वळवला जाणार नाही ना, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

**'एकाच छताखाली' व्यवस्था की निधीवरील सरकारी पकड?**

मोठ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची, भोजनाची आणि योग्य मार्गदर्शनाची मोठी गरज असते. या समस्येवर धर्मादाय संस्था आणि स्वयंसेवी संघटनांच्या माध्यमातून मदत उपलब्ध करून देण्याची कल्पना निश्चितच उपयुक्त आहे.

परंतु या संस्थांना सरकारी यंत्रणेशी कराराच्या चौकटीत आणताना त्यांच्या निर्णयस्वातंत्र्याचे काय होणार, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. विशेषतः सीएसआर निधीचा वापर कोणत्या संस्थेला, कोणत्या प्रकल्पासाठी आणि कोणत्या निकषांवर दिला जाणार, याची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असणे गरजेचे आहे.

**सीएसआर म्हणजे सरकारी तिजोरी नाही!**

कंपन्यांकडून सामाजिक जबाबदारी म्हणून खर्च केला जाणारा सीएसआर निधी हा थेट सरकारी महसूल नसतो. त्यामुळे 'सरकारचे धोरण' आणि 'कंपन्यांचा सीएसआर निधी' यांच्यातील सीमारेषा स्पष्ट राहणे आवश्यक आहे. राज्य सरकारने समन्वयकाची भूमिका बजावणे आणि कंपन्यांच्या सीएसआर खर्चाचे अप्रत्यक्ष नियंत्रण घेणे, या दोन बाबींमध्ये मूलभूत फरक आहे.

सरकारच्या नव्या यंत्रणेमुळे धर्मादाय संस्था आणि कंपन्यांना रुग्णसेवेसाठी अधिक प्रभावीपणे काम करता आले, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. मात्र सीएसआर निधी कोणत्या संस्थेकडे वळवायचा, कोणत्या प्रकल्पाला प्राधान्य द्यायचे किंवा कोणत्या संस्थेला सरकारी मान्यता मिळणार, यामध्ये राजकीय किंवा प्रशासकीय हस्तक्षेपाची शक्यता निर्माण होऊ नये.

**पारदर्शकता नसेल तर प्रश्न अधिक गंभीर**

सरकारने या उपक्रमाला 'पारदर्शक आणि सुसूत्र यंत्रणा' असे स्वरूप दिले आहे. त्यामुळे भविष्यात सीएसआर किंवा धर्मादाय निधीचा वापर करणाऱ्या प्रत्येक प्रकल्पाची माहिती सार्वजनिक करणे आवश्यक ठरणार आहे.

किती निधी आला? कोणत्या कंपनीने दिला? कोणत्या संस्थेला मिळाला? कोणत्या रुग्णालयात खर्च झाला? किती लाभार्थींना मदत मिळाली? प्रशासनाने त्याचे ऑडिट केले का? या सर्व प्रश्नांची उत्तरे नागरिकांना सहज उपलब्ध झाली पाहिजेत.

अन्यथा 'रुग्णसेवेच्या नावाखाली सीएसआर निधीला सरकारी नियंत्रणाच्या चौकटीत आणले जात आहे', अशी टीका होणे अपरिहार्य ठरेल.

**मदत हवी, नियंत्रण नव्हे!**

गरजू रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मदत मिळणे ही प्राथमिक गरज आहे. सरकारने धर्मादाय संस्था, स्वयंसेवी संघटना आणि कॉर्पोरेट क्षेत्राला एकत्र आणण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे; मात्र सीएसआर निधीवर थेट किंवा अप्रत्यक्ष सरकारी नियंत्रण निर्माण होणार नाही, याची स्पष्ट हमीही द्यावी.

रुग्णसेवेच्या नावाखाली उभारली जाणारी नवी यंत्रणा खरोखरच लोकहिताची ठरायची असेल, तर तिचा पाया पारदर्शकता, स्वतंत्र निर्णयप्रक्रिया, सार्वजनिक लेखापरीक्षण आणि राजकीय हस्तक्षेपमुक्त कार्यपद्धती यावरच असला पाहिजे.

कारण सीएसआर हा कंपन्यांचा सामाजिक निधी आहे; तो कोणत्याही सरकारची समांतर तिजोरी बनता कामा नये.

# 'शाळा दत्तक घ्या' म्हणणारे शिंदे; मग विद्यार्थ्यांच्या आवाजावर एफआयआर का? शिक्षण की राजकीय दडपशाही?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील शाळांचे आधुनिकीकरण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि शिक्षण व्यवस्थेत गुणवत्तापूर्ण बदल घडवण्याचा निर्धार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. आमदार-खासदारांनी आपल्या मतदारसंघातील शाळा दत्तक घेऊन त्यांच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. घोषणा ऐकायला आकर्षक आहेत. पण याच वेळी विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले, आंदोलन केले किंवा सत्तेला जाब विचारला तर त्यांच्यावर गुन्हे दाखल होणार असतील, तर हीच शिक्षणव्यवस्थेची लोकशाही कुठे आहे? असा सवाल उपस्थित होतो.

शिक्षण म्हणजे केवळ अभ्यासक्रम, परीक्षा आणि गुण नव्हेत, असे शिंदे यांनीच म्हटले आहे. विद्यार्थ्यांचा मानसिक, भावनिक, बौद्धिक आणि सामाजिक विकास हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. मग विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची क्षमता, मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आणि अन्यायाविरोधात उभे राहण्याचे धैर्य निर्माण करणे हेही शिक्षणाचाच भाग नाही का?

याच पार्श्वभूमीवर विद्यार्थी नेता अभिजीत दिपके यांच्याविरोधातील फर्म मुद्दा गंभीर ठरतो. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल होत असेल, तर सरकारने स्वतःच्या 'युवा-केंद्रित' धोरणाचा आरसा एकदा पाहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी फक्त सरकारच्या योजनांचे कौतुक करायचे, पण सरकारच्या निर्णयांवर प्रश्न विचारायचे नाहीत, अशी अपेक्षा आहे का?

शाळा दत्तक घेणे, आधुनिक सुविधा निर्माण करणे, शिक्षकांना प्रशिक्षण देणे, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि मानसिक स्वास्थ्यासाठी उपक्रम राबवणेहे सगळे आवश्यकच आहे. परंतु आधुनिक शाळा म्हणजे केवळ डिजिटल बोर्ड, चांगल्या इमारती आणि स्मार्ट वर्गखोल्या नव्हेत. आधुनिक शिक्षणाची खरी कसोटी म्हणजे विद्यार्थ्याला प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य किती आहे.

लोकशाहीमध्ये सरकारवर टीका करणे हा गुन्हा नसतो. एखाद्या आंदोलनात कायदा मोडला असेल, हिंसाचार झाला असेल किंवा विशिष्ट कायद्याचे उल्लंघन झाले असेल, तर चौकशी आणि कायदेशीर कारवाईला कोणीही विरोध करू शकत नाही. पण केवळ राजकीय मतभेद, सरकारविरोधी भूमिका किंवा आंदोलनाचा आवाज यामुळे गुन्हेगारी कारवाई होत असेल, तर त्यामागील हेतूवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. शाळा दत्तक घेण्याचे आवाहन करणाऱ्या सत्तेने विद्यार्थ्यांच्या आवाजालाही 'दत्तक' घेतले पाहिजेदडपले नाही पाहिजे. आजचा तरुण सोशल मीडियावर प्रश्न विचारतो, रस्त्यावर उतरतो, धोरणांवर चर्चा करतो आणि सत्ताधाऱ्यांना थेट जाब विचारतो. त्याला गप्प बसवून 'आदर्श विद्यार्थी' तयार होणार नाही. उलट, प्रश्न विचारणाऱ्या पिढीला गुन्हेगार ठरवले तर लोकशाहीवरील त्यांचा विश्वासच कमी होईल.

सरकारने शिक्षणाच्या विकासासाठी मिशन मोडवर काम करण्याची घोषणा केली आहे. उत्तम. पण त्याच मिशनचा एक भाग *'लोकशाही शिक्षण'* का असू नये? संविधान, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार आणि सरकारला प्रश्न विचारण्याचा हक्क यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे.

कारण उद्याचे आमदार, खासदार, प्रशासकीय अधिकारी आणि न्यायाधीश याच विद्यार्थ्यांतून घडणार आहेत. आज त्यांना प्रश्न विचारण्याची सवय लावली नाही, तर उद्या सत्तेला प्रश्न विचारणारी लोकशाही कोण उभी करणार? म्हणूनच शिंदे यांच्या घोषणेतील 'भविष्यवेधी शिक्षणव्यवस्था' ही संकल्पना प्रत्यक्षात आणायची असेल तर सरकारने एक गोष्ट स्पष्ट करावी

शाळा दत्तक घ्या, पण विद्यार्थ्यांचा आवाज गुन्हा म्हणून दत्तक घेऊ नका!

शिक्षणाचे आधुनिकीकरण इमारतींपासून नव्हे, तर विचारांच्या स्वातंत्र्यापासून सुरू होते.

## संपादकीय

### देशातील चार हजार पेक्षा जास्त आजी-माजी आमदार-खासदार गुन्हेगारीच्या खटल्यांच्या रांगेत असेल तर; देशाच्या जनतेने काय करावे?

देशातील आमदार-खासदार जर गुन्हेगारीतुन संविधानिक पदावर बसत असेल तर देशाचे पुढील भवितव्य किंवा भविष्य जेन-झीसाठी किंवा जेन-अल्फासाठी धोका निर्माण करू शकते.कारण देशातील ४००० पेक्षा जास्त आजी-माजी आमदार-खासदारांविरूध्द एकूण ४१९२ गुन्हेगारी प्रकरणातील खटले आजही प्रलंबित आहेत. तरीही लोकप्रतिनिधींचा बहुमान;हा तर लोकशाहीचा घोर अपमान व जेन-झीवर आणि जेन-अल्फावर घणाघाती प्रहारच म्हणावा लागेल. राजकीय पुढाऱ्यांच्या या चुकीच्या मार्गामुळे देशात कोणत्या प्रकारची लोकशाही आहे हे कळायला मार्ग नाही. देशात एकीकडे भ्रष्टाचाराचा महापूर दिसून येतो तर दुसरीकडे गुन्हेगारीचे प्रलंबित खटले यामुळे देशातील मुठभर राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवून करोडपती झाल्याचे दिसून येते;तर दुसरीकडे बेरोजगारी, महागाई,शिक्षण इत्यादी अनेक समस्यांचा मोठा डोंगर उभा आहे व त्यात भर टाकत आहे गुन्हेगारीचे खटले असणारे आमदार-खासदार हे तर लोकशाहीला काळीमा फासणारी घटना म्हणावी लागेल. कारण ज्यांना आपण लोकप्रतिनिधी समजतो आणि देशासह राज्यांचा कारभार पहातात अशा आमदार-खासदारांवर गुन्हे असतांना सरकारच्या सुरक्षेयंत्रणेखाली वावरतात व देशाच्या १४५ कोटी जनतेला ग्यान पाजतात हे कसले लोकप्रतिनिधी म्हणावेत हे तर देशाचे मुख्य कसाईच म्हणावे लागेल.

कारण देशातील राजकारण्यांच्या गुन्हेगारीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालातून चिंताजनक,गंभीर व देशाला धक्का देणारी माहिती समोर आली आहे.

लोकसभेतील ५४३ खासदारांपैकी २५१,तर राज्यसभेतील २३३ खासदारांपैकी ७५ खासदारांवर गुन्हेगारी प्रकरणातील खटले प्रलंबित आहेत. म्हणजे देशातील अर्धे खासदार गुन्हेगारी क्षेत्रातुन येवून दिल्लीत लोकसभेत व राज्यसभेत बसले आहेत ही कीती शर्मेची बाब म्हणावी! यावरून स्पष्ट होते की, देशात किंवा राज्यात जे काही गुन्हेगारी प्रवृत्ती दिसून येते त्याला कारणीभूत देशातील गुन्हेगार लोकप्रतिनिधीच(गुन्हेगार आमदार-खासदार) म्हणावे लागेल. त्याचप्रमाणे देशातील २८ राज्यांपैकी १४ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी स्वतःविरूद्ध गुन्हेगारी प्रकरणे असल्याचे जाहीर केले. तरीही ते आजही मुख्यमंत्री पदावर विराजमान आहेत ही किती लाजीरवाणी व शर्मेची गोष्ट म्हणावी. म्हणजे आपण गुन्हेगार आहोत आणि महत्वपूर्ण पदावर बसण्यालायक नाही हे माहीत असूनही महत्वाच्या पदांवर कार्यरत आहेत यावरून स्पष्ट होते की, देशातील आजी-माजी आमदार-खासदार कायदा,स्वाभिमान,संविधान,लोकशाही, लोकांच्या वेदना व देशाचे हित बाजूला सारून महत्त्वाच्या पदांवर विराजमान आहेत ही अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर बाब म्हणावी लागेल. भारतात लोकशाही आहे आणि लोकशाही प्रमाणे देश चालतो असे म्हटले जाते. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे, देशातील राजकारण्यांच्या गुन्हेगारीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालातून चिंताजनक व गंभीर माहिती समोर आल्याने देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावनांचा दुखावल्या आहेत. ऑगस्ट २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अधिकृत अहवालानुसार, देशातील ३२६ खासदारांवर गुन्हेगारी स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. यामध्ये लोकसभेतील ५४३ पैकी २५१ खासदार आणि राज्यसभेतील २३३ पैकी ७५ खासदारांवर गुन्हेगारी खटले आहेत. म्हणजे लोकसभेच्या ४६ टक्के खासदारांवर गुन्हेगारी स्वरूपाचे खटले आहेत तर ३३ टक्के गुन्हेगारी खटले राज्यसभेच्या खासदारांवर आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे लोकसभेच्या २५१ पैकी १७० खासदारांवर अत्यंत गंभीर स्वरूपाचे गुन्हे (उदा. खून, खुनाचा प्रयत्न,अपहरण आणि महिलांविरोधातील गुन्हे) दाखल आहेत तरी ते लोकप्रतिनिधी आहेत. राज्यसभेच्या बाबतीत विचार केला तर गंभीर गुन्हे असलेल्या ७५ खासदारापैकी ४० खासदारांवर ५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळाच्या शिक्षेची तरतूद असलेले गंभीर गुन्हे दाखल आहेत. म्हणजे अर्धा देश गुन्हेगार आमदार-खासदांच्या मार्गदर्शनाखाली चालतो की काय असे चित्र दिसत आहे. महत्वाचे म्हणजे एकूण प्रलंबित खटल्यामध्ये देशातील ४००० पेक्षा अधिक आजी-माजी आमदार-खासदारांवर ४,१९२ हून अधिक फौजदारी खटले सध्या न्यायालयात प्रलंबित आहेत. अहवालानुसार राज्यनिहाय आकडेवारीचा विचार केला तर केरळ राज्यातील सर्वाधिक म्हणजेच ९५% (२० पैकी १९) खासदारांवर गुन्हे दाखल आहेत. त्यापाठोपाठ तेलंगणामध्ये ८२% आणि ओडिशामध्ये ७६% खासदारांची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालमधील सुमारे ५०% खासदारांवर गुन्हेगारी खटले सुरू आहेत. म्हणजे देश कुठे जात आहे याचा विचार राजकीय पुढाऱ्यांनी करने गरजेचे आहे. अहवालानुसार २८ राज्यांपैकी १४ राज्यातील मुख्यमंत्र्यांवर फौजदारी खटले आहेत यात प्रामुख्याने तेलंगणाचे मुख्यमंत्री अनुमुला रेवंत रेड्डी यांच्या विरुद्ध सर्वाधिक ८९ प्रकरणे आहेत, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुबेंदू अधिकारी यांच्या विरुद्ध २९ प्रकरणे आहेत, कर्नाटकचे मुख्यमंत्री बी. के. शिवकुमार यांच्या विरुद्ध १९ प्रकरणांची नोंद असल्याचे सांगितले जाते. अशाप्रकारे १४ राज्यांच्या वेगवेगळ्या मुख्यमंत्र्यांवर गुन्हेगारी खटले प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत सर्वप्रथम गुन्हेगारी प्रकरणातील खटल्याचा निकाल जलदगतीने लावून या आमदार-खासदारांची विल्हेवाट लावून यांना ताबडतोब बर्खास्त करून यांचे पगार,पेन्शन,भत्ते रद्द केले पाहिजे व त्यांनी केलेल्या गुन्ह्याची शिक्षा त्यांना मिळायला पाहिजे. कारण कोणताही लोकप्रतिनिधी असो त्यांच्यावर असलेले गंभीर गुन्हे देशाला व देशहिताला घातक ठरू शकते. त्यामुळे देशातील संपूर्ण गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आमदार-खासदारांच्या मुसक्या महामहीम राष्ट्रपती,सुप्रीम कोर्ट व सरकारनी कायद्याच्या मार्फत आवळल्या पाहिजे अशी या लेखाद्वारे विनंती करतो. जय हिंद.

# पवना धरण ओव्हरफ्लो, तरी पाणी कपात सुरूच? 'धरण भरले, मग नळ कोरडे का?'; १५% कपात रद्द करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पवना धरण १०० टक्के भरले असून धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असतानाही पिंपरी-चिंचवडकरांवरील १५ टक्के पाणी कपात कायम का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. धरणात मुबलक पाणी असताना नागरिकांच्या नळाला मात्र कपातीचे पाणी का? असा प्रश्न उपस्थित करत सामाजिक कार्यकर्ते तथा भाजप पदाधिकारी जयेश शिवराज चौधरी यांनी पाणी कपात तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

पवना धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असताना शहरात पाणी कपात सुरू ठेवण्याची आवश्यकता काय, असा सवाल चौधरी यांनी केला. प्रशासनाने नागरिकांना नियमित, सुरळीत आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

शहरातील अनेक नागरिकांना पाणीपुरवठ्याच्या वेळेमुळे मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः महिला, कार्यालयीन कामासाठी बाहेर पडणारे नागरिक आणि सकाळच्या वेळेत घरातील कामे



उरकणाऱ्या कुटुंबांना पाणी मिळण्यात अडचणी येत असल्याचे चौधरी यांनी म्हटले आहे.

पिंपरी कॅम्प परिसरात दुपारी १२.३० ते १ या वेळेत पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन वेळापत्रकावर परिणाम होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयीचा विचार करून सकाळच्या वेळेत पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक निश्चित करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

चौधरी यांनी कृत्रिम पाणीटंचाई निर्माण करणे योग्य नसल्याचे सांगत, शहरातील प्रत्येक नागरिकाला पुरेसा पाणीपुरवठा मिळणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

दरम्यान, पवना धरण भरलेले असताना पाणी कपात सुरू ठेवण्यामागे प्रशासनाचे नेमके कारण काय? हा प्रश्न आता महापालिका प्रशासनाला द्यावा लागणार आहे. धरणातील उपलब्ध पाणीसाठा, शहराची पाण्याची मागणी आणि भविष्यातील नियोजन यांचा आढावा घेऊन कपातीबाबत तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे.

धरण १०० टक्के भरले असताना पाणी कपात कशासाठी? नागरिकांना नियमित, सुरळीत आणि पुरेशा दाबाने पाणी मिळाले पाहिजे. प्रशासनाने १५ टक्के पाणी कपात तात्काळ रद्द करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जयेश शिवराज चौधरी यांनी केली आहे.

## भेसळ अन्नाची असो अथवा विचारांची, समाज आणि राष्ट्रासाठी घातकच : तुकाराम मुंढे


■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

अन्न आणि विचारांची भेसळ समाज आणि राष्ट्रासाठी घातक असते. नागरिकांनी अन्नाबाबत चौकस राहून आपल्या विचारांमध्येही डिजिटल युगात भेसळ होऊ नये, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे, असे स्पष्ट मत अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मांडले.

दिशा सोशल फाउंडेशनच्या वतीने 'भेसळमुक्त महाराष्ट्र, आरोग्यदायी महाराष्ट्र' या उपक्रमांतर्गत प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह, चिंचवड येथे आयोजित 'मनमोकळा संवाद' कार्यक्रमात शनिवारी (दि. २२) सायंकाळी मुंढे यांनी हजेरी लावली. ज्येष्ठ पत्रकार मयूरेश कोण्णूर यांनी या मुलाखतीचे सूत्रसंचालन केले. मुंढे यांच्या आगमनावेळी उपस्थितांनी उभे राहून टाळ्यांचा गजर करीत त्यांचे स्वागत केले. मुंढे म्हणाले की, केवळ झोपलेल्या व्यक्तीला जागे करता येते, झोपेचे सोंग घेणाऱ्याला नव्हे.

जंक फूड आणि भेसळयुक्त पदार्थ आरोग्यासाठी हानिकारक ठरतात, म्हणून नागरिकांनी चौकस राहिले पाहिजे. विभागाच्या कारवाया 'मुंढे पॅटर्न' नसून ते त्यांच्या नियमित कर्तव्याचा एक भाग आहेत. 'प्रामाणिकपणा आणि नैतिकता नसताना यश तात्पुरतेच राहते,' असे ते म्हणाले. मुंढे यांच्या २१ वर्षांच्या



सेवेत २५ बदल्या झाल्या असून, त्यांच्या कामाच्या गतीत त्यानंतर वाढ झाल्याचे त्यांनी सांगितले. सोशल मीडियावरील वाढत्या लाइक्स आणि फॉलोअर्सवर सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देताना त्यांनी समाजात योग्य काय, हे नागरिकांनी ठरवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. दिशा सोशल फाउंडेशनच्या वतीने तुकाराम मुंढे यांचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व खेळाडूंचा त्यांनी सत्कार केला. मुंढे यांच्या जीवनावर आधारित पुस्तकातील काही अंशांचे वाचनही करण्यात आले. या प्रसंगी महापौर रवी लांगडे, दिशा फाउंडेशनचे सचिन साठे, रवी करपे, आजी-माजी पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

## संविधान बहुमताचे नव्हे, कायद्याचे राज्य; सरकारला चौकटीत ठेवणारी व्यवस्था : सुरेश द्वादशीवार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

संविधान म्हणजे केवळ सामान्य नागरिकांसाठी करण्यात आलेले नियम नसून, सरकारला चौकटीत बांधून ठेवणारी व्यवस्था आहे. लोकशाही म्हणजे बहुमताचे राज्य नव्हे, तर कायद्याचे राज्य होय, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक व पत्रकार सुरेश द्वादशीवार यांनी केले.

ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत आणि युवक क्रांती दलाचे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या ८५व्या जयंतीनिमित्त गांधी भवन येथे 'संविधानासमोरील प्रश्न' या विषयावर द्वादशीवार यांच्या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत व माजी आमदार उल्हास पवार होते.

यावेळी विश्वंभर चौधरी, असीम सरोदे, अनंत बागाईतकर, रवींद्र पोखरकर, प्रवीण सप्तर्षी, प्रमोद वागदरीकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

**'वैचारिक मतभेद होते, मनभेद नव्हते'**

डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या आठवणींना उजाळा देताना द्वादशीवार म्हणाले, डॉ. सप्तर्षी यांचे आपल्यात नसणे ही अत्यंत दुःखद बाब आहे. त्यांच्याशी माझा सुमारे ६० वर्षांचा संपर्क होता. आमच्यात वैचारिक मतभेद होते; मात्र मनभेद कधीच नव्हते. कुमार हा केवळ नेता नव्हता, तर खरा कार्यकर्ता होता.

संविधानाची भूमिका स्पष्ट करताना द्वादशीवार यांनी सांगितले की, लोकशाही व्यवस्थेत केवळ निवडणुकीत बहुमत मिळवणे पुरेसे नाही. सत्तेवर असलेल्या सरकारनेही संविधान आणि कायद्याच्या चौकटीत राहूनच कारभार करणे अपेक्षित आहे. सत्ता कोणाचीही असो, संविधान हे सत्तेवर नियंत्रण ठेवणारे मूलभूत साधन आहे.

नागरिकांना त्यांच्या घटनात्मक अधिकारांची पुरेशी जाणीव नसल्यास सत्ताधाऱ्यांकडून घटनात्मक मर्यादा ओलांडल्या जाण्याची शक्यता निर्माण होते, अशी चिंताही त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे नागरिकांनी संविधान समजून घेणे आणि आपल्या अधिकारांबाबत जागरूक राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

**उद्देशिकेच्या वाचनाने कार्यक्रमाची सुरुवात**

कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने करण्यात आली. त्यानंतर डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वस्त सचिव अन्वर राजन यांनी केले.

डॉ. सप्तर्षी यांच्या सामाजिक, गांधीवादी आणि लोकशाहीवादी विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी संविधानविषयक जागृती आणि वैचारिक संवादाची आवश्यकता असल्याचे यावेळी उपस्थित वक्त्यांनी अधोरेखित केले.

# कंपनीच्या बनावट आयडीवरून ३० लाखांची ऑनलाईन फसवणूक; एमआयडीसी भोसरी पोलिसांत गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे / भोसरी । प्रतिनिधी**

कंपनीच्या संचालकांच्या नावे बनावट मायक्रोसॉफ्ट टीम्स आयडी तयार करून कंपनीची तब्बल ३० लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार भोसरी येथे समोर आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात अज्ञात आयडी धारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, भोसरी येथील बालाजीनगर, टेल्को रोड परिसरातील 'जी.एन.एस. इंजिनिअरिंग इंडीया प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीत फिर्यादी गजेंद्र भारत भोरे (वय ३२, रा. काळेवाडी, मूळ रा. गुलबर्गा, कर्नाटक) नोकरीस आहेत. १९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १:१० ते २:३० वाजण्याच्या सुमारास, अज्ञात आरोपीने कंपनीचे संचालक 'संजय पनवार' यांच्या नावाशी मिळताजुळता बनावट मायक्रोसॉफ्ट टीम्स आयडी 'Sanjay Panwar' तयार केला.

या बनावट आयडीद्वारे कंपनीच्या ग्रुपमध्ये बेकायदेशीर प्रवेश करून आयसीआयसीआय बँकेच्या (ICICI Bank) 'MAA DAKHINAKALI ENTERPRISES' या बँक खात्यावर तात्काळ ३० लाख रुपये पाठवण्याचा मेसेज पाठवण्यात आला. हा मेसेज अधिकृत समजून कंपनीच्या बँक ऑफ बडोदा खात्यातून ३० लाख रुपये ट्रान्सफर करण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच कंपनीच्या वतीने पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली.

**गुन्हा दाखल व तपास:**

फिर्यादीच्या तक्रारीवरून एमआयडीसी भोसरी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध बी.एन.एस. कलम ३१८(४), ३१९ आणि आयटी ॲक्ट ६६(डी), ६६(सी) अंतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मिसाळ आणि पोलीस उपनिरीक्षक खडसे करत आहेत.

**इतर ताज्या बातम्या (संक्षिप्त):**

**गुंतवणुकीवर नफ्याचे आमिष दाखवून ६४ लाखांची फसवणूक:**

भोसरी येथील गोडावून चौकातील 'ग्रो कॅपिटल' व 'विश्वांजली व्हेंचर्स' या कंपन्यांत आयात-निर्यात व्यवसायात गुंतवणुकीवर दरमहा १० टक्के नफ्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची ६४ लाख ८५ हजार ३४८ रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी मनोज अशोक पाटील, दिगंबर सुर्यवंशी यांच्यासह दोघा महिलांवर भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल.

**ट्रॅव्हल्स बसच्या फेऱ्यांचे पैसे न देता ४.१४ लाखांची फसवणूक:**

चाकण (खेड) येथे शाळेसाठी वापरलेल्या रुद्र ट्रॅव्हल्सच्या बसचे ४ लाख १४ हजार १०० रुपये थकवून टाळाटाळ केल्याप्रकरणी शाळा व्यवस्थापक सोमनाथ आनंदराव थोरात याच्याविरुद्ध म्हाळुंगे एमआयडीसी पोलिसांत गुन्हा नोंद.

**रिक्षाचे भाडे मागितल्यावरून चालकावर लोखंडी टॉमीने हल्ला:**

वाकडमधील भुमकर चौक मच्छी मार्केटजवळ रिक्षाचे भाडे २० रुपये मागितल्याच्या कारणावरून दारू पिण्यासाठी २०० रुपयांची मागणी करत चालकाला लोखंडी टॉमीने डोक्यात मारून जखमी केल्याप्रकरणी हनुमंत बिराजदार व मंगेश गायकवाड यांच्यावर हिंजवडी पोलिसांत गुन्हा दाखल.

**दरमहा १०% नफ्याचे आमिष दाखवून ६४ लाखांची फसवणूक; भोसरी पोलिसांत चौघांवर गुन्हा दाखल**

पुणे / भोसरी:

परदेशात खाद्यपदार्थ आयात-निर्यात करणाऱ्या कंपनीत गुंतवणुकीवर दरमहा १० टक्के नफा देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची तब्बल ६४ लाख ८५ हजार ३४८ रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार भोसरी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी भोसरी पोलिसांनी चौघांविरुद्ध फसवणुकीसह महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार विक्की अशोक हनुमंते (वय ४१, रा. विजय नगर, काळेवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपींनी भोसरी येथील गोडावून चौकातील जय गणेश साम्राज्य इमारतीमध्ये 'ग्रो कॅपिटल' व 'विश्वांजली व्हेंचर्स एल.एल.पी.' या नावाच्या कंपन्यांचे कार्यालय थाटले होते. आरोपींनी फिर्यादी व इतर गुंतवणूकदारांना या कंपन्यांमार्फत भारतातून परदेशात खाद्यपदार्थांची मोठी आयात-निर्यात चालत असल्याचे भासवले.

कंपनीमध्ये १ लाख रुपयांची गुंतवणूक केल्यास पुढील २० महिने दरमहा १० टक्के नफा दिला जाईल आणि अधिकचा परतावाही मिळेल, असे आमिष आरोपींनी दाखवले. या प्रलोभनाला बळी पडून फिर्यादी व इतर गुंतवणूकदारांनी जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण ८४ लाख ५१ हजार ६८८ रुपये ऑनलाईन व रोख स्वरूपात गुंतवले.

**६४ लाखांचा गंडा:**

सुरुवातीला विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी गुंतवणूकदारांना १९ लाख ६६ हजार ३४० रुपये परतावा म्हणून परत केले. मात्र, उर्वरित ६४ लाख ८५ हजार ३४८ रुपयांची मूळ रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापरून गुंतवणूकदारांची फसवणूक केली.

**आरोपींची नावे:**

१) मनोज अशोक पाटील (वय ४६, रा. वर्धा)

२) शोभा पाटील (वय ४०, रा. वर्धा)

३) महिला आरोपी (वय अंदाजे ४४, रा. काळेवाडी, पुणे)

४) दिगंबर दत्तराव सुर्यवंशी (वय ४२, रा. छत्रपती संभाजीनगर)

**पोलिसांत गुन्हा दाखल:**

या प्रकरणी भोसरी पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१६(२), ३१६(५), ३(५) तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम (MPID) कलम ३ व ४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवकुमार दगडगावे व महिला पोलीस उपनिरीक्षक हर्षदा पाटील करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### डोर्लेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र एनक्युएएस मानांकनाच्या उंबरठ्यावर

**राज्यस्तरीय मूल्यांकन यशस्वीरीत्या पूर्ण; आता राष्ट्रीय समितीच्या अंतिम पाहणीची प्रतीक्षा**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती : प्रतिनिधी**

तालुक्यातील डोर्लेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राने राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके (NQAS) प्रमाणपत्राच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. केंद्राचे राष्ट्रीय मानांकनासाठी आवश्यक असलेले राज्यस्तरीय मूल्यांकन नुकतेच यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. राज्यस्तरीय मूल्यांकनादरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवांचा दर्जा, रुग्णांची सुरक्षितता, उपलब्ध सुविधा, स्वच्छता, पायाभूत सुविधा तसेच रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवांची गुणवत्ता यांसह विविध निकषांची पाहणी करण्यात आली. या मूल्यांकनामुळे डोर्लेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सुविधांचा दर्जा आणखी उंचावण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे मानांकन महत्त्वाचे मानले जात आहे. राज्यस्तरीय मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता केंद्र अंतिम राष्ट्रीय मानांकनासाठी सज्ज झाले आहे. पुढील टप्प्यात केंद्रीय समितीकडून प्राथमिक आरोग्य केंद्राची अंतिम पाहणी केली जाण्याची अपेक्षा आहे. या पाहणीनंतर NQAS प्रमाणपत्राबाबत अंतिम निर्णय होणार आहे. डोर्लेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन मिळाल्यास परिसरातील नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या आरोग्य सेवांच्या गुणवत्तेला अधिकृत मान्यता मिळण्याबरोबरच केंद्राच्या सुविधांमध्ये आणि कार्यपद्धतीत सातत्याने सुधारणा करण्यासही चालना मिळणार आहे.

# शिरदाळे येथे ग्रामदैवत श्री हनुमान देवाचा भंडारा उत्सव भक्तिभावात संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

शिरदाळे (ता. आंबेगाव) येथे ग्रामदैवत श्री हनुमान देवाचा भंडारा उत्सव शनिवार (दि. २२) रोजी मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उत्सवानिमित्त दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ठीक ७ वाजता ह.भ.प. तान्हाजी महाराज तांबे यांच्या हस्ते श्री हनुमान देवाची नित्यपूजा करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत प्रमोद काका देखणे यांच्या मंत्रोच्चारात श्री हनुमान देवाला महाभिषेक करण्यात आला. महाभिषेकानंतर ग्रामस्थांच्या उपस्थितीत महाआरती संपन्न झाली.

सायंकाळी ७.३० वाजता संपूर्ण गावासाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. महाप्रसादामध्ये पुरी, गुळवणी, कांद्याची मिरची आणि हिरवी मिरची असा पारंपरिक बेत ठेवण्यात आला होता. महाप्रसादाची तयारी करण्यासाठी गावातील महिला भगिनी तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोलाचे योगदान दिले. तर महाप्रसाद वाटपाचे नियोजन गावातील तरुण मंडळींनी केले.

उत्सवाची सांगता श्री हनुमान प्रासादिक भजनी मंडळ, शिरदाळे यांच्या भक्तिमय भजनाने झाली.



धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने गावातील महिला, ज्येष्ठ नागरिक, तरुण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या उत्सवातून शिरदाळे गावची धार्मिक परंपरा, एकजूट आणि सामाजिक बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली. ग्रामदैवताच्या उत्सवामुळे संपूर्ण गावात भक्तिमय आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्याने शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण होते. मात्र, उत्सवाच्या दिवशी पावसाने समाधानकारक हजेरी लावल्याने शेतकऱ्यांसह ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसून आले. पावसामुळे शेतीला दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## अवसरी बुद्रुक येथे बिबट्याचा धुमाकूळ; दोन कालवडींचा फडशा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचे पिंजरा लावण्याची मागणी; परिसरात भीतीचे वातावरण

मंचर : अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव) येथील हिंगे वस्ती परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला असून, दूध उत्पादक शेतकरी सर्जेराव किसनराव हिंगे पाटील यांच्या घरालगतच्या गोठ्यात बांधलेल्या दोन कालवडींचा बिबट्याने फडशा पाडला. शनिवारी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या हल्ल्यात सुमारे दोन वर्षे वयाच्या दोन्ही कालवडींचा मृत्यू झाला असून, त्यांची अंदाजे किंमत एक लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. या घटनेमुळे हिंगे वस्ती परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अवसरी बुद्रुक गावाच्या पूर्वेला हिंगे वस्ती असून, येथे सुमारे ४० ते ४५ कुटुंबे राहतात. परिसरात मोठ्या प्रमाणात ऊस शेती तसेच डोंगररांगा असल्याने बिबट्यांचा वावर सातत्याने जाणवत आहे. गेल्या काही वर्षांत या भागात बिबट्यांचा वावर वाढला असून, यापूर्वी वनविभागाकडून बिबट्याला पकडण्यासाठी दोन-तीन वेळा पिंजरेही लावण्यात आले होते.

शनिवारी रात्री सर्जेराव हिंगे पाटील यांनी घरालगतच्या शेतातील गोठ्यात दोन कालवडी बांधल्या होत्या. रात्री परिसरातील कुत्री मोठ्या प्रमाणात भुंकत असल्याचे नागरिकांनी सांगितले. रविवारी सकाळी हिंगे पाटील गोठ्यात गाईचे दूध काढण्यासाठी गेले असता, दोन्ही कालवडी बिबट्याच्या हल्ल्यात मृतावस्थेत आढळून आल्या.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृत कालवडींची पाहणी करून पंचनामा केला.

दरम्यान, हिंगे वस्ती परिसरात बिबट्याचा वाढता वावर लक्षात घेता वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे शेतात काम करण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.

## काठापूर बुद्रुकमध्ये मादी बिबट्या जेरबंद; ग्रामस्थांनी सोडला सुटकेचा निःश्वास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

काठापूर बुद्रुक (ता. आंबेगाव) येथील गणेशनगर परिसरात मागील अनेक दिवसांपासून वावर असलेल्या मादी बिबट्याला वनविभागाने शनिवारी (दि. २२) पहाटे पिंजऱ्यात जेरबंद केले. अंदाजे साडेतीन वर्षे वयाच्या या मादी बिबट्याला पकडण्यात यश आल्याने काठापूर परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

काठापूर बुद्रुक येथील पांडुरंगवस्ती, भोकरवाडी आणि गणेशनगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचे वारंवार दर्शन होत होते. त्यामुळे



परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. बिबट्याचा वाढता वावर लक्षात घेता ग्रामस्थांनी वनविभागाकडे पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी केली होती.

ग्रामस्थांच्या मागणीनंतर वनविभागाने गणेशनगर येथील नारायण लहू जाधव यांच्या घरासमोर दोन दिवसांपूर्वी पिंजरा लावला होता. शनिवारी पहाटे बिबट्याची मादी पिंजऱ्यात अडकली. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत बिबट्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले.

जेरबंद करण्यात आलेल्या मादी बिबट्याला पुढील तपासणी व उपचारासाठी जुन्नर येथील माणिकडोह बिबट निवारा केंद्रात नेण्यात आले आहे.

बिबट्याला पकडण्यासाठी मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली नीलम चव्हाण, पूजा कांबळे आणि वनविभागाचे कर्मचारी अशोक जाधव यांनी प्रयत्न केले. बिबट्या जेरबंद झाल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, शेतीकामासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांमधील भीती काही प्रमाणात कमी झाली आहे.

# अवसरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतिगृहात पाण्यासाठी विद्यार्थिनींचे आंदोलन

### २१९ विद्यार्थिनींचा संताप; वारंवार तक्रारीनंतरही प्रश्न कायम, पाइपलाइन दुरुस्तीनंतर पाणीपुरवठा सुरळीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर : प्रतिनिधी**

शिक्षणासाठी घरापासून दूर राहणाऱ्या विद्यार्थिनींसाठी सुरक्षित व स्वच्छ वातावरणासोबतच नियमित पाणीपुरवठा ही मूलभूत गरज आहे. मात्र, अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतिगृहात पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने विद्यार्थिनींवर रात्री आंदोलन करण्याची वेळ आली. बादल्या हातात घेऊन विद्यार्थिनींनी प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली.

या वसतिगृहात राज्याच्या विविध भागांतून शिक्षणासाठी आलेल्या तब्बल २१९ विद्यार्थिनी वास्तव्यास आहेत. गेल्या काही दिवसांपासून वसतिगृहात पाण्याची कमतरता जाणवत होती. विद्यार्थिनींनी याबाबत प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित उपाययोजना न झाल्याने अखेर त्यांनी रात्री आंदोलन करत आपला संताप व्यक्त केला.

वसतिगृहातील पाणीपुरवठ्याच्या पाइपलाइनमध्ये तांत्रिक दोष निर्माण झाल्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. समस्या निर्माण झाल्यानंतर विद्यार्थिनींची गैरसोय टाळण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला होता. मात्र, कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने विद्यार्थिनींनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

पाण्याच्या समस्येमुळे विद्यार्थिनींच्या दैनंदिन




जीवनावर तसेच अभ्यासावरही परिणाम होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. विविध भागांतून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थिनींना पाणी आणि इतर मूलभूत सुविधांसाठी आंदोलन करावे लागणे ही प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने पाइपलाइनमधील दोष दूर करण्याचे काम हाती घेतले. दुपारी साडेतीनच्या सुमारास पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. त्यामुळे विद्यार्थिनींना काहीसा दिलासा मिळाला.

विद्यार्थ्यांकडून विविध शुल्क आकारले जात असताना त्यांना पाणी, स्वच्छता आणि सुरक्षिततेसारख्या मूलभूत सुविधा नियमितपणे उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. भविष्यात पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी पाणीपुरवठा यंत्रणेची नियमित देखभाल करून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी विद्यार्थिनींकडून करण्यात येत आहे. मूलभूत सुविधांसाठी विद्यार्थिनींना आंदोलनाची वेळ येणे ही बाब प्रशासनाने गांभीर्याने घेऊन वसतिगृहातील पाणीपुरवठा यंत्रणेची कायमस्वरूपी दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

## निरगुडसर-निरगुडसर फाटा रस्त्यावर खडीचा खच; अपघाताचा धोका वाढला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

निरगुडसर (ता. आंबेगाव) ते निरगुडसर फाटा या रस्त्यावर हायवा डंपरमधून खडी पडल्याने वाहनचालकांसह विद्यार्थी व ग्रामस्थांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून रस्त्यावर पडलेली खडी तशीच असल्याने विशेषतः दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका वाढला आहे.

निरगुडसर ते मेंगडेवाडी मार्गे जाणाऱ्या या रस्त्यावर मोठ्या वाहनांसह दुचाकी, सायकल आणि इतर लहान वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यातच जारकरवाडी व गवारमळा परिसरातून अनेक विद्यार्थी दररोज सायकलवरून निरगुडसर येथे शिक्षणासाठी ये-जा करतात. रस्त्यावर पडलेली खडी दुचाकीस्वार



तसेच सायकलस्वारांसाठी धोकादायक ठरत असल्याने पालकांमध्येही चिंता व्यक्त होत आहे.

रस्त्यावर पडलेल्या खडीवरून एखादा विद्यार्थी सायकलवरून घसरून अपघात झाला, तर त्याला जबाबदार कोण? असा सवाल स्थानिक ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. रस्त्याचे काम आधीच प्रदीर्घकाळापासून रखडलेले असताना त्यातच रस्त्यावर खडी पडल्याने नागरिकांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.

संबंधित हायवा डंपरमधून खडी पडली असल्यास संबंधित चालकांवर कारवाई करावी तसेच रस्त्यावर पडलेली खडी तातडीने हटवून मार्ग सुरक्षित करावा, अशी मागणी विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी केली आहे.

रस्त्यावर पडलेल्या खडीमुळे एखादा गंभीर अपघात होण्याची प्रशासन वाट पाहत आहे का, असा संतप्त सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात असून संबंधित विभागाने तातडीने दखल घेण्याची मागणी होत आहे.

# गावापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत 'मानकांनुसार आरोग्यसेवा'; रुग्णालयनिहाय सुविधा निश्चित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांना त्यांच्या गरजेनुसार दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने रुग्णालयनिहाय आरोग्यसेवांची सर्वसमावेशक मानके निश्चित केली आहेत. ग्रामीण रुग्णालयापासून उपजिल्हा, सामान्य आणि जिल्हा रुग्णालयापर्यंत कोणत्या स्तरावर कोणत्या आरोग्य सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर, तपासण्या, मनुष्यबळ, औषधे आणि पूरक सेवा उपलब्ध असाव्यात, याची स्पष्ट रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

या निर्णयामुळे राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील आरोग्यसेवा अधिक सुसूत्र आणि परिणामकारक होण्यास मदत होणार असून, नागरिकांना आपल्या गरजेनुसार योग्य आरोग्य संस्थेची निवड करणे सुलभ होणार आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यास मदत होईल.

### रुग्णालयाच्या क्षमतेनुसार उपचारांची व्यवस्था

ग्रामीण रुग्णालय, ३०, ५० आणि १०० खाटांची उपजिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये अशा विविध स्तरांवर उपलब्ध असणाऱ्या सेवांचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. रुग्णालयाची क्षमता आणि सेवा स्तर लक्षात घेऊन तज्ज्ञ वैद्यकीय सेवा, नर्सिंग, अलाइड हेल्थ व पॅरामेडिकल मनुष्यबळ, प्रयोगशाळा, रेडिओलॉजी आणि अन्य रुग्णसेवांची उपलब्धता निश्चित करण्यात आली आहे.

फिजिशियन, सर्जन, स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, अस्थिव्यंगतज्ज्ञ, नेत्रशल्यचिकित्सक, भूलतज्ज्ञ, रेडिओलॉजिस्ट आणि दंतशल्यचिकित्सक अशा विविध तज्ज्ञ सेवांचा रुग्णालयाच्या स्तरानुसार समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आवश्यक उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध होऊन रुग्णांना उपचारासाठी दूरच्या शहरांकडे जाण्याची गरज कमी होण्याची अपेक्षा आहे.

### ३०८ प्रकारच्या निदानात्मक चाचण्यांचे मानक

नागरिकांना आवश्यक तपासण्या स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी निदानात्मक सेवांचेही स्पष्ट मानक निश्चित करण्यात आले आहे. ग्रामीण रुग्णालयांमध्ये ७६, १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयांमध्ये ११०, तर जिल्हा रुग्णालयांमध्ये १२२ प्रकारच्या निदानात्मक चाचण्या उपलब्ध असण्याचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये रक्तातील साखर, हिमोग्लोबिन, विविध रक्त तपासण्या, यकृत व मूत्रपिंड कार्य तपासण्या, लिपिड प्रोफाइल, क्लअ१ उ, थायरॉईड, पॅप स्मिअर तसेच विविध संसर्गजन्य आजारांच्या तपासण्यांचा समावेश आहे.

### एक्स-रेपासून एमआरआयपर्यंत सुविधा

रुग्णालयाच्या स्तरानुसार एक्स-रे आणि सोनोग्राफीसारख्या रेडिओलॉजी सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. १०० खाटांपेक्षा अधिक क्षमतेच्या रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅन, तर जिल्हा रुग्णालय स्तरावर एमआरआय सुविधेचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे गंभीर आजारांचे निदान अधिक वेगाने आणि अचूकपणे करण्यास मदत होणार आहे.

### कुशल मनुष्यबळाला प्राधान्य

गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेसाठी डॉक्टरांसोबत प्रशिक्षित नर्सिंग आणि पॅरामेडिकल मनुष्यबळाचेही रुग्णालयनिहाय निकष निश्चित करण्यात आले आहेत. प्रयोगशाळा तंत्रज्ञ, ईसीजी तंत्रज्ञ, क्ष-किरण तंत्रज्ञ, रक्तपेढीतील कर्मचारी, आहारतज्ज्ञ, भौतिकोपचार तज्ज्ञ, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते आणि मनोरुग्ण सामाजिक कार्यकर्ते यांचा यामध्ये समावेश आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य संस्थांना अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले असून, त्यामध्ये १११ सुपर स्पेशालिस्ट, १,५१९ स्पेशालिस्ट, २,९१९ वैद्यकीय अधिकारी, ३,००५ आयुष वैद्यकीय अधिकारी आणि ११,५७१ स्टाफ नर्स यांचा समावेश आहे.

### माता-बाल आरोग्य, डायलिसिस व रक्तसेवांना प्राधान्य

रुग्णालयनिहाय मानकांमध्ये रक्तपेढी व रक्त संक्रमण केंद्र, डायलिसिस, आयुष सेवा, लसीकरण कक्ष, माता-बाल आरोग्य सेवा आणि प्रसूती कक्ष यांसारख्या महत्त्वाच्या सुविधांचाही समावेश करण्यात आला आहे.

रुग्णवाहिका, दिव्यांग प्रमाणपत्र, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र, डिस्चार्ज प्रमाणपत्र, जन्म-मृत्यू नोंदणी, जननी सुरक्षा योजनेचा लाभ, आहार सुविधा आणि तक्रार निवारण व्यवस्था अशा नागरिकाभिमुख सेवांनाही या मानकांमध्ये महत्त्व देण्यात आले आहे.

### 'आरोग्यसेवेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढेल'

नागरिकाला कोणत्या रुग्णालयात कोणती सेवा मिळणार, कोणते तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध असतील, कोणत्या तपासण्या होतील आणि कोणत्या सुविधा उपलब्ध असतील, याची स्पष्ट माहिती मिळणार असल्याने नागरिकांचा शासकीय आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला.

## सारांश वृत्त

### राष्ट्रवादीला बाहेरच्या 'रणनीतीकारा'ची शिकवणी! पक्ष सुस्त, संघटना थंड; पार्थ पवारांच्या घरी खडे बोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक अवस्थेवर आता पक्षाच्या घरातच गंभीर आत्मपरीक्षणाची वेळ आली आहे. खासदार पार्थ पवार यांच्या वरळी येथील निवासस्थानी झालेल्या बैठकीत राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना पक्ष पूर्णपणे थंड पडला आहे, राज्यात अस्तित्व ठळकपणे दिसत नाही, अशा शब्दांत वास्तवाची जाणीव करून दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पक्षाचे विभाग प्रभावीपणे कार्यरत नाहीत, तळागाळाशी संपर्क कमी झाला आहे आणि समन्वयाचा अभाव वाढत आहे, असे निरीक्षण किशोर यांनी मांडल्याचे सांगितले जाते. महामंडळांवरील नियुक्त्यांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना सक्रिय करणे, शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत संघटना मजबूत करणे आणि तरुणांना केवळ गर्दी म्हणून नव्हे, तर नेतृत्वाच्या केंद्रस्थानी आणणे, असा सल्लाही त्यांनी दिल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मात्र, या बैठकीतील सर्वात मोठा राजकीय संदेश वेगळाच आहे. ज्या राष्ट्रवादीने महाराष्ट्राच्या राजकारणात दशके नेतृत्व केले, त्या पक्षाला आज संघटना उभी करण्यासाठी बाहेरच्या रणनीतीकाराची शिकवणी घ्यावी लागत आहे, हीच पक्षाच्या अवस्थेवरची सर्वात मोठी टिप्पणी नाही का?

पक्षाध्यक्ष सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी किशोर यांच्या सूचनांचा गांभीर्याने विचार करून मतभेद बाजूला ठेवत कामाला लागण्याचे आवाहन केल्याचे सांगितले जाते. मात्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रशांत किशोर बैठकीला उपस्थित नसल्याचे स्पष्ट करत पक्षातील फूट आणि मतभेदांच्या चर्चांना नकार दिला आहे. यामुळे प्रश्न अधिकच गडद झाला आहेपक्षात खरोखर सर्व काही आलबेल असेल, तर बाहेरून 'चिंतन' करून घेण्याची वेळ का आली? राष्ट्रवादीतील ज्येष्ठ नेत्यांमध्ये या सल्ल्याबाबत नाराजी असल्याचीही चर्चा आहे. पक्षाच्या स्थापनेपासून काम करणाऱ्या अनुभवी नेत्यांना बाहेरील रणनीतीकाराने राजकारणाचे धडे देणे काहींना रुचलेले नाही.

# मैदानांपासून मोकळ्या जागांपर्यंत 'डल्ला' कुणाचा? विकासाच्या नावाखाली जमीन हस्तांतरणाचा संशय!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील प्रत्येक मोकळी जागा, मैदान, आरक्षित भूखंड आणि सार्वजनिक वापराची जमीन आता एका नव्या प्रश्नाच्या भोवऱ्यात सापडली आहे*ही जमीन जनतेसाठी आहे की विकासाच्या नावाखाली कोणाच्या तरी फायद्यासाठी?*

वांद्र्यातील मैदानाच्या आरक्षण बदलावरून सुरू झालेला वाद हा केवळ एका मैदानापुरता मर्यादित नाही. तरुण खेळाडूंच्या हक्काच्या मैदानावर कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याचा प्रस्ताव, आरक्षण बदलाची प्रक्रिया आणि त्यानंतर मुंबई फुटबॉल असोसिएशनने घेतलेली न्यायालयीन धावया संपूर्ण घटनाक्रमाने सार्वजनिक जमिनींच्या वापराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

एकीकडे सरकार विकास, पायाभूत सुविधा आणि गुंतवणुकीच्या नावाने नवनवीन प्रकल्पांची घोषणा करते; दुसरीकडे नागरिकांच्या ताब्यातील मोकळ्या जागा, मैदाने आणि सार्वजनिक उपयोगाच्या भूखंडांकडे व्यावसायिक नजरेने पाहिले जात असल्याचा आरोप सातत्याने होत आहे. *जमीन सरकारी असो, म्हाडाची असो किंवा महापालिकेचीअखेर ती जनतेच्या पैशातून निर्माण झालेली सार्वजनिक संपत्ती आहे.*

वांद्र्यातील प्रकरणात तर दररोज हजारो खेळाडू सराव करतात, अधिकृत फुटबॉल सामने होतात, अशा मैदानाच्या भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयानेही प्रशासनाला *नागरिकांनी फुटबॉल कुठे खेळायचा?* असा सवाल केला आणि संबंधित निर्णयावर स्थगिती देत परिस्थिती जैसे थे ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. हा सवाल केवळ एका मैदानाचा नाही; तो संपूर्ण शहराच्या सार्वजनिक जागांबाबतचा आहे.

आज मैदान, उद्या उद्यान, परवा आरक्षित भूखंड आणि त्यानंतर मोकळी सरकारी जमीन*विकासाच्या नावाखाली सार्वजनिक मालमत्तेचे स्वरूप बदलण्याचा हा सिलसिला कुठे थांबणार?*

याहून गंभीर प्रश्न म्हणजे अशा बदलांमागे नेमका सार्वजनिक हिताचा अभ्यास किती आणि खासगी हितसंबंध किती? एखाद्या भूखंडाचे आरक्षण बदलायचे असेल, तर त्यामागील कारणे, लाभार्थी, आर्थिक व्यवहार, निविदा प्रक्रिया आणि अंतिम वापर यांची संपूर्ण माहिती जनतेसमोर का ठेवली जात नाही?

सरकारने जमीन विकली नाही, हस्तांतरित केली नाही, असा युक्तिवाद केला जाऊ शकतो. पण आरक्षण बदलून त्या जमिनीचा वापर बदलला तर त्याचा प्रत्यक्ष फायदा कोणाला होणार? हा प्रश्न टाळता येणार नाही.

मुंबईसारख्या शहरात मोकळी जमीन ही केवळ रिकामी जागा नसते. ती मुलांचे मैदान असते, ज्येष्ठांचा श्वास असतो, नागरिकांसाठी सार्वजनिक अवकाश असतो आणि भविष्यातील पिढ्यांचा हक्क असतो. त्यामुळे अशा जमिनींच्या वापरात बदल करताना सरकारने पारदर्शकता, सार्वजनिक चर्चा आणि नागरिकांचा सहभाग अनिवार्य केला पाहिजे.

*सरकारने 'विकास' या शब्दाला ढाल बनवून प्रत्येक सार्वजनिक जमिनीचा वापर बदलण्याची परवानगी स्वतःलाच दिली, तर उद्या शहरात जनतेसाठी उरणार तरी काय? वांद्र्यातील मैदानाचा वाद न्यायालयात पोहोचला आहे. त्यामुळे आरोप खरे की खोटे, हे न्यायालयीन प्रक्रियेत स्पष्ट होईल. परंतु या निमित्ताने एक मोठा प्रश्न मात्र सरकारसमोर उभा राहिला आहे*सार्वजनिक जमिनींचा मालक सरकार आहे की विश्वस्त? सरकार मालकासारखे वागणार असेल तर जनतेने प्रश्न विचारलेच पाहिजेत. कारण *जमीन सरकारच्या नावावर असली, तरी ती जनतेची संपत्ती आहे. तिचा निर्णय बंद दाराआड होऊ शकत नाही.

## एच१एन१चा नवा प्रकार नाही; सध्याची लस पुरेशी ' भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचा स्पष्ट खुलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

देशात एच१एन१च्या नव्या प्रकारामुळे संसर्गाची मोठी लाट येणार असल्याच्या चर्चांना भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने पूर्णविराम दिला आहे. भारतात सध्या आढळणारे एच१एन१ विषाणू नवीन प्रकारचे नसून, २०२५ पासून प्रसारित होत असलेल्या विषाणूच्या प्रकाराशी संबंधित आहेत. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक भीती बाळगण्याचे कारण नसल्याचे भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने रविवारी, २३ ऑगस्ट रोजी स्पष्ट केले.

परिषदेच्या माहितीनुसार, भारतात सध्या प्रसारित होणारे इन्फ्लुएंझा 'अ' म्हणजेच एच१एन१ विषाणू 'ए/मिसूरी/११/२०२५' या प्रकारासारखे आहेत. हे विषाणू 'क्लेड ६बी.१ए.५ए२ए' आणि त्याच्या 'डी.३.१.१' उपप्रकाराशी संबंधित आहेत. विशेष म्हणजे, हा विषाणू २०२५ पासूनच प्रसारित होत असल्याने सध्या देशात एच१एन१चा एखादा पूर्णपणे नवीन प्रकार उदयास आल ाचे कोणतेही पुरावे नाहीत. याहून महत्त्वाची बाब म्हणजे सध्या भारतात प्रसारित होत असलेल्या इन्फ्लुएंझाच्या प्रकारांचा उत्तर गोलार्धासाठी शिफारस करण्यात आलेल्या लसीतील विषाणूंच्या प्रकारांशी चांगला मेळ असल्याचे परिषदेने सांगितले आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत नवीन लस विकसित करण्याची आवश्यकता असल्याचे कोणतेही संकेत नाहीत. मात्र, 'नवा प्रकार नाही' याचा अर्थ 'धोका नाही' असा घेणेही चुकीचे ठरेल. परिषदेने स्पष्ट केले आहे की हंगामी इन्फ्लुएंझा, ज्यामध्ये एच१एन१चाही समावेश आहे, सामान्यतः स्वतःहून बरा होणारा आजार आहे. मात्र आधीपासून काही आजार असलेल्या व्यक्तींमध्ये गुंतागुंत होण्याचा धोका अधिक असू शकतो. त्यामुळे प्रश्न अफवांचा नाही, तर सावधगिरीचा आहे. एच१एन१चा नवा प्रकार नसल्याचे स्पष्ट झाले असले, तरी लक्षणे गंभीर वाटल्यास दुर्लक्ष न करणे आणि जोखमीच्या गटातील व्यक्तींनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. घबराट नको; पण निष्काळजीपणाही नको, हाच भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या संदेशाचा खरा अर्थ आहे.

## केपीएससी 'घोटाळ्या'वर ईडीचा धडाका; आयएएस अधिकारी गंगवार यांच्या घरावर छापे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

कर्नाटक लोकसेवा आयोगाच्या अर्थात केपीएससीच्या भरती प्रक्रियेतील कथित गैरव्यवहाराचा तपास आता निर्णायक वळणावर पोहोचला आहे. या प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने म्हणजेच ईडीने रविवारी आयएएस अधिकारी ज्ञानेंद्र कुमार गंगवार यांच्या बंगळुरूतील निवासस्थानी तसेच उत्तर प्रदेशातील बरेली येथील संबंधित ठिकाणांवर छापेमारी केली. या कारवाईसाठी आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याचा आधार घेण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

गंगवार हे सध्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विभागाचे संचालक आहेत. मात्र, यापूर्वी ते कर्नाटक लोकसेवा आयोगाचे परीक्षा नियंत्रक म्हणून कार्यरत होते. याच काळात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या भरतीसाठी परीक्षा घेण्यात आली होती. या भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे आरोप झाले असून, काही उमेदवारांकडून नोकरी मिळवून देण्यासाठी मोठ्या रकमा मागितल्याचेही दावे करण्यात आले आहेत. त्यामुळे आता ईडीच्या तपासाचा केंद्रबिंदू केवळ परीक्षा प्रक्रियेपुरता मर्यादित राहतो की कथित आर्थिक व्यवहारांपर्यंत पोहोचतो, याकडे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे, छापेमारीच्या आदल्या दिवशी गंगवार हे उत्तर प्रदेशातील त्यांच्या मूळ गावी जाऊन परतले होते. जवळपास दोन दिवस त्यांचा संपर्क होत नसल्याचेही वृत्त समोर आले होते. त्यानंतर लगेचच त्यांच्या निवासस्थानी ईडीचे अधिकारी पोहोचल्याने या प्रकरणाला आणखी प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

कर्नाटक लोकसेवा आयोगासारख्या सरकारी भरती संस्थेच्या प्रक्रियेवरच पैशांच्या व्यवहाराचे आरोप होत असतील, तर हा केवळ एका परीक्षेतील गैरव्यवहाराचा प्रश्न राहत नाही; तो संपूर्ण सरकारी भरती व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. आता ईडीच्या छाप्यांमधून नेमके काय हाती लागते, कोणते आर्थिक व्यवहार समोर येतात आणि या कथित घोटाळ्यामागे आणखी कोणाची नावे उघड होतात, यावर या तपासाची पुढची दिशा ठरणार आहे.

## श्रद्धेच्या नावाखाली गर्दी की राजकीय शक्तिप्रदर्शन? भक्तीला सत्तेची उपस्थिती का हवी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर : प्रतिनिधी**

श्रावण, शिवआराधना, पार्थिव शिवलिंग आणि अध्यात्मभारतीय समाजाच्या भावविश्वाशी घट्ट जोडलेले विषय. श्रद्धा ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे आणि ती मनापासून जपण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मात्र, जेव्हा श्रद्धेच्या नावाखाली मोठमोठे धार्मिक सोहळे, हजारोंची गर्दी आणि त्यात सत्ताधाऱ्यांची उपस्थिती यांचे राजकीय चित्रण सुरू होते, तेव्हा प्रश्न विचारणेही गरजेचे ठरते.

मानकापूर येथे आयोजित पार्थिव शिवलिंग निर्मिती सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिली. त्यांनी स्वतः तीन शिवलिंगांची निर्मिती केली आणि उपस्थित भाविकांना शुभेच्छा दिल्या. आयोजकांनी यंदा ११ लाख पार्थिव शिवलिंग निर्मितीचा संकल्प केला आहे. धार्मिक दृष्टिकोनातून हा उपक्रम भाविकांसाठी श्रद्धेचा विषय असू शकतो. पण त्याचवेळी धर्म आणि सत्तेचे सार्वजनिक प्रदर्शन यांच्यातील सीमारेषा कुठे आखायची? हा प्रश्नही महत्त्वाचा आहे.

आजच्या राजकारणात धर्म हा केवळ वैयक्तिक श्रद्धेपुरता राहिलेला नाही, तर तो गर्दी जमविण्याचे आणि राजकीय प्रतिमा मजबूत करण्याचे प्रभावी माध्यम बनत चालला आहे, अशी टीका वारंवार केली जाते. धार्मिक कार्यक्रमात मुख्यमंत्री किंवा अन्य राजकीय नेत्यांची उपस्थिती असणे चुकीचे नाही. मात्र, त्या उपस्थितीचे अवाजवी राजकीय भांडवल केले जाऊ लागले, तर धर्माच्या नावाखाली नागरिकांच्या भावनांचे राजकीयीकरण होण्याचा धोका निर्माण होतो.

लोकांना पूजा करायची असेल तर त्यांना सरकारच्या उपस्थितीची गरज नाही. मंदिरात जाण्यासाठी राजकीय नेत्याचे दर्शन आवश्यक नाही. देवाच्या भक्तीसाठी सत्तेच्या व्यासपीठाची आवश्यकता नाही. श्रद्धा ही व्यक्ती आणि तिच्या आराध्य देवतेमधील नाते आहे; त्यामध्ये सत्तेने मध्यस्थ होण्याची गरजच काय? विशेषतः तरुण पिढीसमोर हा प्रश्न अधिक गंभीर आहे. एका बाजूला बेरोजगारी, शिक्षणाचा खर्च, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास, महागाई आणि रोजगाराच्या संधी यांसारखे प्रश्न आहेत. दुसऱ्या बाजूला धार्मिक कार्यक्रमामध्ये प्रचंड गर्दी, भव्य आयोजन आणि राजकीय नेत्यांच्या उपस्थितीला मोठे प्रसिद्धीमूल्य मिळते. तरुणांच्या हातात रोजगाराची हमी देण्याऐवजी श्रद्धेची गर्दी देऊन त्यांच्या प्रश्नांपासून लक्ष विचलित तर केले जात नाही ना?याचा अर्थ धार्मिक कार्यक्रमांना विरोध असा अजिबात नाही. उलट, श्रद्धा, संस्कृती आणि परंपरा जपण्याचा प्रत्येक नागरिकाला पूर्ण अधिकार आहे. पण धर्म वैयक्तिक श्रद्धा राहावा आणि राजकारण सार्वजनिक धोरणांपुरते मर्यादित राहावे, ही लोकशाहीची आरोग्यदायी अपेक्षा आहे. ११ लाख पार्थिव शिवलिंग तयार होतील, त्यांचे विसर्जन होईल आणि धार्मिक सोहळा पूर्ण होईल. पण त्याचवेळी शासनाने ११ लाख नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडेही तितक्याच गांभीर्याने पाहिले पाहिजे. कारण मंदिरातील घंटानादाबरोबर रोजगाराची घंटाही वाजली पाहिजे; धार्मिक उत्सवाबरोबर शिक्षणाची संधीही वाढली पाहिजे; श्रद्धेच्या घोषणेबरोबर संविधानातील समानतेची हमीही मजबूत झाली पाहिजे.

## केंद्राच्या आश्वासनांवर 'सीजेपी'ची पुन्हा नजर; २४ ऑगस्टच्या बैठकीनंतर आंदोलनाची ठिणगी पुन्हा पेटणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी नेमकी कुठपर्यंत पोहोचली, याचा आढावा घेण्यासाठी 'कॉकरोच जनता पार्टी' अर्थात सीजेपीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक सोमवार, २४ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे. विशेष म्हणजे, २५ जुलै रोजी देशव्यापी आंदोलन मागे घेतल्यानंतर सरकारने दिलेल्या आश्वासनांवर अद्याप अधिकृतपणे पुढील कार्यवाहीची माहिती देण्यात आलेली नसल्याचा दावा सीजेपीने केला आहे.

सीजेपीने स्पष्ट केले आहे की, केंद्र सरकारच्या आश्वासनांची वस्तुस्थिती तपासल्यानंतर पुढील भूमिका निश्चित केली जाईल. त्यामुळे आंदोलन मागे घेतले असले तरी संघर्ष संपलेला नाही, असा स्पष्ट संदेश संघटनेने दिला आहे. विद्यार्थ्यांना, तरुण नागरिकांना, समर्थकांना आणि स्वयंसेवकांना २४ ऑगस्टच्या बैठकीच्या निकालासाठी तयार राहण्याचे आवाहन करण्यात



आले आहे.

२५ जुलै रोजी देशव्यापी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय झाल्यानंतर केंद्र सरकारने सीजेपीसमोर काही महत्त्वाची आश्वासने दिल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. मात्र, त्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी सरकारकडून नेमकी कोणती पावले उचलली जात आहेत, याबाबत अद्याप औपचारिक माहिती मिळालेली नसल्याने सीजेपीने आता सरकारला अप्रत्यक्षपणे इशारा दिला आहे.

या पार्श्वभूमीवर २४ ऑगस्टची बैठक महत्त्वाची ठरणार आहे. सरकारने आश्वासनांची अंमलबजावणी सुरू केल्याचे समाधानकारक पुरावे दिले नाहीत, तर सीजेपी पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारू शकते. म्हणजेच २५ जुलैला संपलेले आंदोलन आता खरोखर संपले आहे की केवळ तात्पुरते थांबले आहे, याचे उत्तर पुढील काही तासांत मिळण्याची शक्यता आहे.

सीजेपीने विद्यार्थी, तरुण, समर्थक आणि स्वयंसेवकांना तयार राहण्याचे आवाहन केल्याने राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारच्या आश्वासनांची परीक्षा आता सीजेपी घेणार असून, २४ ऑगस्टची बैठक सरकारच्या शब्दांवर शिक्कामोर्तब करणार की पुन्हा आंदोलनाची हाक देणार, याकडे देशाचे लक्ष लागले आहे.

## मुंढेंच्या खाद्यतेल मोहिमेला सरकारचा 'बॅकअप'? व्यापारी न्यायालयात जाणार; आता सरकारची कसोटी!

■ नाशिक : प्रतिनिधी

सुट्टे खाद्यतेल विक्रीवर निर्बंध घालण्याच्या अन्न व औषध प्रशासनाच्या निर्णयामुळे राज्यातील व्यापारी आणि प्रशासन आमनेसामने आले आहेत. आयुक्त तुकाराम मुंढे यांनी भेसळयुक्त आणि असुरक्षित खाद्यतेलामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे सांगत कडक भूमिका घेतली आहे. मात्र, व्यापाऱ्यांनी या निर्णयाला विरोध करत सरकारला १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला असून निर्णय मागे न घेतल्यास न्यायालयात जाण्याचा आणि राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

मुंढे यांच्या भूमिकेनुसार सुट्टे तेल विक्रीत गुणवत्ता, लेबलिंग आणि उत्पादनाची माहिती तपासणे अवघड असल्याने ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोका निर्माण होऊ शकतो. भेसळ, नियमांचे उल्लंघन आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर कठोर कारवाईची तरतूद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. नागरिकांनी पॅकेज्ड तेल घेताना लेबल, सील आणि मुदत तपासावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे. दुसरीकडे व्यापाऱ्यांचा सवाल आहेदहा लाखांचा दंड आणि कारावासाची तरतूद असताना आम्ही अतिरेकी आहोत का? नाशिकमध्ये झालेल्या बैठकीत व्यापाऱ्यांनी निर्णय मागे न घेतल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला. गरज पडल्यास न्यायालयीन लढाईसोबत केंद्र सरकारकडेही पाठपुरावा करण्याचे त्यांनी स्पष्ट केले. आता प्रश्न केवळ मुंढे विरुद्ध व्यापारी असा राहिलेला नाही. सरकार आपल्या अधिकाऱ्याच्या कठोर भूमिकेमागे ठामपणे उभे राहणार की व्यापारी दबावापुढे निर्णय नरम करणार? हा खरा प्रश्न आहे. अन्न सुरक्षा हा थेट नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित विषय आहे. त्यामुळे भेसळ रोखण्यासाठी कठोर कारवाई आवश्यकच आहे. मात्र, त्याचवेळी कायद्याची अंमलबजावणी स्पष्ट नियम, पारदर्शक प्रक्रिया आणि सर्व व्यापाऱ्यांना समान निकषांवर झाली पाहिजे.

## तेलाची आयात कमी करण्यासाठी मका आयात, आणि आता साखरेचीही आयात? 'ई२०'च्या गणितात भारत कुठे अडकला?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताने परदेशी कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी इथेनॉल मिश्रणाला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचे म्हणजेच 'ई२०' धोरण हे ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने मोठे पाऊल म्हणून मांडले गेले. पण या धोरणाची दुसरी बाजू पाहिली, तर एक उपरोधिक चित्र समोर येतेतेलाची आयात कमी करायची म्हणून मका आयात करावा लागतोय आणि इथेनॉलच्या कच्च्या मालासाठी ऊस वळवल्यामुळे भविष्यात साखरेची आयात करण्याची वेळ आली तर?

ई२० इंधनात ८० टक्के पेट्रोल आणि २० टक्के इथेनॉल असते. इथेनॉल तयार करण्यासाठी ऊस आणि मका हे प्रमुख स्रोत आहेत. सरकारचा यामागचा तर्क आहेकच्चे तेल कमी आयात करा, इथेनॉल देशात तयार करा आणि परकीय चलन वाचवा. ऐकायला गणित अगदी सोपे आहे. पण प्रत्यक्षात या गणितात एक प्रश्न अडकलेला आहेइथेनॉलसाठी लागणारा कच्चा माल पुरवणार कोण?

भारत काही काळापूर्वीपर्यंत मका निर्यात करणारा देश होता. आता इथेनॉल निर्मितीसाठी देशांतर्गत मागणी वाढल्याने मक्याच्या उपलब्धतेवर दबाव वाढत आहे आणि आयातीची गरज निर्माण होत आहे. म्हणजेच कच्च्या तेलाची आयात कमी करण्यासाठी आपण एका वेगळ्या वस्तूच्या आयातीचा दरवाजा उघडतोय. आयात कमी झाली नाही; फक्त आयातीच्या यादीत वस्तू बदलली!

याहून गंभीर प्रश्न साखरेचा आहे. ऊसापासून मोठ्या प्रमाणावर इथेनॉल तयार केल्यास साखर उत्पादनासाठी उपलब्ध ऊस कमी होऊ शकतो. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात साखरेचा देशांतर्गत पुरवठा आणि किंमत स्थिर ठेवणे महत्त्वाचे आहे. जर इथेनॉलसाठी ऊसाचा वापर वाढला आणि देशांतर्गत साखरेचा तुटवडा निर्माण झाला, तर साखर आयात करण्याची वेळ येऊ शकते. म्हणजे एका बाजूला पेट्रोलमध्ये देशी इथेनॉल मिसळून 'स्वावलंबन' साजरे करायचे आणि दुसऱ्या बाजूला बाजारातील साखरेची गरज भागवण्यासाठी परदेशातून साखर आणायची!

साखरेची आयात वाढली तर त्याचा थेट परिणाम देशांतर्गत साखर उद्योगावर होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय बाजारातील स्वस्त साखर भारतात आली, तर देशातील साखर कारखान्यांना किंमत स्पर्धेचा सामना करावा लागू शकतो. शेतकऱ्यांच्या ऊसदरावर दबाव येऊ शकतो आणि साखर उद्योगाच्या आर्थिक गणितावर परिणाम होऊ शकतो. म्हणजे इथेनॉलच्या एका टक्क्याच्या वाढीसाठी दुसऱ्या बाजूला शेतकरी, साखर कारखाने आणि ग्राहक यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारचा दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे.

आणखी गंमत म्हणजे आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती गेल्या काही महिन्यांत कमी झाल्या असतानाही ई२० इंधन स्वस्त होण्याचा फायदा ग्राहकांना स्पष्टपणे मिळताना दिसत नाही. त्यामागे भारतातील मक्याचे कमी उत्पादन, वाढलेल्या इथेनॉल मागणीला सामावून घेण्यासाठी अपुरी क्षमता आणि साखरेचा देशांतर्गत वापर व निर्यात यांच्यातील समतोल राखण्याचे आव्हान आहे.